SJIF 2014 = 3.189
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# मानसशास्त्राचे विविध संप्रदाय :- वर्तनवाद

**प्रा. अजयकुमार रामदास इंगळे**, Ph.D

**समर्थ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भाडणे, साक्री, जि. धुळे**

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

जे.बी. वॅटसन (वॉटसन) १८७८-१९५८ हे अमेरीकन मानसशास्त्र वर्तनवादाचे मानसशास्त्रज्ञ जनक होते. १९१२ साली त्यांनी वर्तनवाद मांडला वॉटसन हे प्राणी मानसशास्त्रज्ञ होते. डार्वीनच्या उत्क्रांतीच्या उत्पत्तीमुळे जीवशास्त्राकडे विशेषतः प्राण्यांच्या शास्त्रीय अभ्यासकाकडे अनेक शास्त्रज्ञांचे लक्ष वेधले गेले प्राणी वर्तनाच्या अभ्यासातूनच वॉटसनच्या वर्तनवादाचा जन्म झाला प्राणी मानसशास्त्रातील तत्वे व पध्दती यांच्या साह्याने मानवी वर्तनाचा अभ्यास केला गेला.

## मानसशास्त्रातील वर्तनवाद खालीप्रमाणे :-

१. मानवी वर्तन हे "**अंतप्रेरीत**" असते. सजीव ते शिवाय अंत:प्रेरण शक्य नाही. मांजर भूक लागली की एका घरातून दुस-या घरात जात असते. मात्र खुर्ची आपली जागा स्वतःहून बदलू शकत नाही.

२. मानवी वर्तन "**अयांत्रिक**" स्वरुपाचे असते. जेवढी शक्ती तेवढेच कार्य हा नियम मानवी वर्तनाला लागून आहे. उदाः- एखादा गवयी पैसा, श्रोता, वेळ या बाह्य चेतकांचा विचार न करता तासं-तास गात बसतो.

३. वर्तनात "**विविधता**" दिसून येते, ते परिस्थिती सापेक्ष असते. सासुवर चिडलेली सुन-स्त्री स्वतःचा पती घरात येताच हसत मुखाने त्याचे स्वागत करते.

४. वर्तन मिळणाऱ्या "**अनुभवांवर आधारीत**" असते. मिळालेले अनुभव हे सजीव प्राण्यांच्या वर्तनात बदल घडवून आणतात. उशीरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांनी शासन केले म्हणजे ते नियमित शाळेत यायला लागता.

५. वर्तन हे "**हेतूपूर्ण**" असते. आपल्या प्रत्येक कृतीमागे काही-ना-काही हेतू असतो.

६. वर्तन "**सातत्यपूर्ण**" असते. उद्दिष्टे सकल होईपर्यंत वर्तन चालू राहते.

मानवी वर्तन हे "**शिक्षीत**" स्वरुपाचे असते. शिक्षणाने संस्काराने त्यात यथायोग्य बदल घडवून आणता येतात. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर अतिउत्तम संस्कार करुन त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणला पाहिजे.

वॉटसनच्या मते अगोदर मानसशास्त्रामध्ये आत्मा, मन, बोधावस्था, संवेदन, प्रतिमा, भावनिकस्थिती यांचा विचार केला जात असे. वॉटसनने या सर्व कल्पना अमान्य केल्या. आत्मनिरिक्षण या मानसशास्त्राच्या अभ्यास पध्दतीला सुध्दा त्याचा विरोध होता. आत्मनिरीक्षणाच्या एवजी वस्तूनिष्ठ आणि प्रायोगिक निरीक्षण केले तर विश्वासार्ह निरीक्षण्सा काढता येईल. असे त्याने प्रतिपादन केले. वर्तनाचे निदान करणे आणि नियंत्रण करणे हा मानसशास्त्राचा अभ्यास विषयत्याने निश्चय केला. सजिवांच्या वर्तनांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्रच होय अशी त्याने व्याख्याच केली.

वॉटसनला प्रत्यक्ष दिसणाऱ्या सत्य अशा वर्तनाचा अभ्यास अभिप्रत होता. बोलणे, विचार करणे हे वर्तनच आहे असे त्याने सांगितले. उद्दिपक आणि प्रतिक्रिया, सवयनिर्मिती आणि सवयींचे संघटन या संज्ञांना त्याने महत्व दिले.

**उद्दिपक आणि प्रतिक्रिया यांचे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होय.**

**उद्दिपक** :- बाह्य परिस्थितीतील कोणतीही वस्तू आणि प्राण्यांच्या शरीरातील आंतरीक बदल यांचा समावेश उद्दिपकात होता.

**प्रतिक्रिया** :-प्रतिक्रियेमध्ये क्रियांचा समावेश होतो सर्व मानवी क्रिया या प्रतिक्रियाच आहे.

वॉटसनचे असे म्हणणे होते की, उद्दिपक माहीत असेल तर त्यामुळे घडणारी प्रतिक्रिया अगोदर सांगता येईल तसेच प्रतिक्रिया माहीत असेल तर ती प्रतिक्रिया घडवून आणणारा उद्दिपकही सांगता येईल. एखाद्या अभियंत्यांला यंत्राची पूर्ण माहिती असते, त्याच प्रमाणे मानसशास्त्रज्ञाला मानवी प्राण्यांची पूर्ण माहिती पाहीजे असते. कारण व्यक्तीचे संपूर्ण व्यक्ती म्हणून वर्तन घडते. मानसशास्त्र म्हणुनच व्यक्तिची ज्ञानेद्रिये, स्नायु, ग्रंथी व नससंस्था यांची संपूर्ण माहिती हवी.

इव्हॉन पॉवलॉव्ह आणि बेख्तरेव्ह यांनी सुध्दा वर्तनवादाच्या विचार सरणीत योगदान दिले आहे. त्यांनी अभिसंधानाचे तत्व मांडले, अभिसंधान म्हणजे विशिष्ठ उद्दिपकामुळे विशिष्ठ प्रतिक्रिया घडणे, उदाः- डॉक्टर दिसताच लहान मुल रडते, विस्तवाकडे लहान मुल जात नाही. उद्दिपक प्रतिक्रियेच्या या तत्वानुसार वॉटसनने वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी विविध कसोट्यांचाही उपयोग केला. त्याव्दारे वर्तनाचा वस्तूनिष्ठ अभ्यास होऊ शकतो असे वॉटसनचे मत झाले.

सारांश वॉटसनच्या वर्तनवादाचा वस्तूनिष्ठ पध्दतीवर भर होता. वॉटसनने आत्मनिरिक्षण पध्दती करण्यासाठी खालील चार पध्दतीचा पुरस्कार केला.

१) निरीक्षण पध्दती २) अभिसंधीत प्रतिक्रिया पध्दती (S R⇔) ३) शाब्दीक निवेदन पध्दती ४) कसोट्या पध्दती.

हल आणि टॉलमन हे २० व्या शतकातील अलिकडील वर्तनवादी मानसशास्त्रज्ञ होते. त्यांनी वर्तनवादाचे शैक्षणिक उपयोजन प्रतिपादन केलेले आहे. त्यांनी

परिकल्पना उद्गात्री पध्दतीचा Hypotheticate पुरस्कार केला. त्यांनी अध्ययना संबंधी "**दृढीकरणाचे तत्व**" सांगितले. (Reinforcement सांगितले). वर्तन हे जसे बोधात्म तसेच ते भावनात्मक व कृतीयुक्त सुध्दा असते. टॉलमनने वर्तनाच्या बोधात्मक अंगावर अधिक भर दिला. (Thinking is Behevior)

बी.एफ, स्कीनर यांनी वर्तनाचा वस्तूनिष्ठ दृष्टीकोन विकसीत केला. "**साधक अभिसंधान**" म्हणून तो प्रसिध्दीस आला.

**साधक अभिसंधान** :- बऱ्याचश्या आविष्कारामध्ये प्रतिक्रियेशी संबंधीत असा निश्चित उद्दिपक कोणता आहे हे समजणे अवघड जाते. उदाः- एखाद्यास पत्र लिहणे, उद्दिपक नेमका कोणता? आठवण, फोटो दिसणे, आवेघ, का. आलेल्या पत्राचे उत्तर?

## शैक्षणिक योगदान :-

१. वर्तनवादाचे अध्ययनाच्या वर्तन प्रेरणाच्या मानसशास्त्रात मोलाची भर घातली.

२. वर्तनवादाने मानसशास्त्राला तत्वनिमांसेतून (आत्मा, मन, बोधावस्था, अबोधावस्था) बाहेर काढून मानवी वर्तनापर्यंत आणून सोडले.

३. वर्तनवादाचा मानसशास्त्रातील भावभावना आणि बालवर्तन यांवर मोठा प्रभाव पडला.

४. वर्तनवादाने अध्यापन पध्दतीमध्ये '**क्रमान्वित अध्ययन**' ही नवी पध्दती आणून तीचा यशस्वी उपयोग केला. एकावेळी एक पायरी ताबडतोब पडताळा सक्रिय पडसाद- या तीन तत्वांवर क्रमान्वित अध्ययनाच्या क्रमपाठांची मांडणी केलेली असते. यात दृढीकरणाचेच तत्व आहे.

५. वॉटसन हा '**परिस्थितीवादी**' होता. तो अनुवंशापेक्षा परिस्थितीला आर्थिक महत्व देत असे. वर्तनवादामुळे व्यक्तिमत्व विकासात परिस्थितीचे महत्व प्रस्थापित झाले.

शालेय वातावरणाला .................. प्रसन्न, मंगल, स्वच्छ, सुंदर प्राधान्य आले परिस्थितीचा मानवी वाढ व विकासावरील प्रभाव स्पष्ट झाला.

१. परिस्थितीशी होणारी आंतरक्रिया हीच वर्तनाला जन्म देते यावर वर्तनवादाचा विश्वास होता. "All behavior learned in all interaction of environment" शिक्षण क्षेत्रात म्हणूनच विद्यार्थी ⟺ शिक्षक, शिक्षक ⟺ शिक्षक, शिक्षक ⟺ मुख्याध्यापक, विद्यार्थी ⟺ विद्यार्थी यांच्या आंतरक्रियांना महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले.

२. विद्यार्थ्यांमधील असमायोजनाशी संबंधीत नव्या नव्या पध्दतींचा व तंत्राचा विकास वर्तनवादामुळे झाला. वर्ग अध्ययनाच्या दृढीकरणाची महत्वाची बाब म्हणजे विद्यार्थी जी कृती करतात त्या कृतीला शिक्षकांची स्विकृती असते. उदाः- छान, उत्तम, बरोबर, शाब्बास अशा शब्दांनी चांगलया सवयी स्वीकृतीमुळे, अध्ययन-अध्यापन प्रभावी ठरले. अध्ययन ही वर्तनाचीच कृती आहे. अध्यापन ही सुध्दा वर्तनाचीच कृती आहे. ह्या दोन्ही कृती जर प्रभावी झाल्या तर शिक्षण प्रक्रिया अधिक यशस्वी होते.

३. विशिष्ठ उद्दिपकांमुळे विशिष्ठ प्रक्रिया घडणे नैसर्गिक आहे. परंतू प्रत्येक वेळी नैसर्गिक उद्दिपक उपलब्ध होईलच असे नाही. शिक्षण प्रक्रियेत परिस्थिती व प्रतिक्रिया यांच्यात योजनापूर्वक सहाचर्यसंबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे. असे वर्तनवादी मानसशास्त्र ला वाटते. सामाजिक संबंध निकटवर्तीत्व, आर्वतकत्व, ताजेपणा यावर अवलंबून असतात. शिक्षण प्रक्रियेत म्हणूनच वर्तनवादाच्या प्रभावाने विविध हकझाव्य साधनांचा उपयोग वाढला. शिक्षणक्षेत्रात Teaching Machines चा उपयोग वाढला.

## **संदर्भ ग्रंथ** :-

जगताप डॉ.ह.ना. , शैक्षणिक मानसशास्त्र अनमोल प्रकाशन पुणे, (१९९५)

पारसनीस डॉ.न.रा. प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, नुतन प्रकाशन पुणे (१९९६)

खरात आ.पां. प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र श्री विद्या प्रकाशन पुणे, (१९७४)

करंदीकर डॉ.सुरेश, शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, (१९७४)

**S.S. Chavan, Advance Education Psychology.**

**Bhatiya B.D., Educational Psychology & Guidance, Dhanpat Ral & Sons Juilundur, Delhi (1967)**

**Mathur S.S., Educational Psychology, Vinod Pustak Mandir, Agra (1975)**